सोलापूर विद्यापीठ
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

SOLAPUR UNIVERSITY
Solapur Pune National Highway, Kegaon,
Solapur - 413 255 (Maharashtra)
Phone/Fax : 0217-2744772/70
website:http://su.digitaluniversity.ac

संदर्भ : सोविसो/पीजीप्रवेश/२०१६/ 6451

दिनांक : 13 JUL 2016

प्रति
मा.प्राचार्य/प्राचार्या
प्रस्तुत विद्यापीठ सोलापूर शहरातील सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय- बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेबाबत..

महोदय/ महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरामधील महाविद्यालयात सुरू असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेच्या उपरोक्त पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची द्वितीय फेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे त्यांना प्रवेश घेण्याची अंतिम मुदत १२/०७/२०१६ होती.

सद्यस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया खालील नियमानुसार करण्यात यावी.

१. ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये ऑनलाईन आवेदन पत्र सादर केलेले आहेत परंतू अद्यापही प्रथम व द्वितीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळालेला नाही किंवा प्रथम /व्दितीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेश पत्र मिळूनही महाविद्यालयात प्रवेश घेतला नाही, अशा विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयातील रिक्त जागांवर दि. १८/०७/२०१६ पर्यंत प्रवेश देण्यात यावा.

२. ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना दि. १९/०७/२०१६ पासून महाविद्यालयातील रिक्त जागांवर रू. २००/- इतके विलंब शुल्क आकारून तातडीने प्रवेश द्यावेत.

उपरोक्त नियम हे फक्त शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठीच्या प्रवेशाकरिता राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला स्नेहांकीत,

DNMishra

(डॉ. डी. एन. मिश्रा)
कुलसचिव